जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ९७ दिनांक - ०६/०२/२०२४**

खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर

## मौजमस्तीकरीता मोटर सायकल व सायकल चोरणारे ०२ अल्पवयीन मुलांना खडकी पोलीस स्टेशन कडुन ताब्यात सदर अल्पवयीन मुलांकडुन ०३ गुन्हे उघडकीस.

दिनांक ०५/०२/२०२४ रोजी खडकी पोलीस स्टेशन तपासपथक प्रमुख पोलीस उप निरीक्षक संतोष भांडवलकर, व तपास पथक स्टाफ असे मिळून खडकी पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करत असताना पोलिस अमंलदार संदेश निकाळजे यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, रेंजहिल्स,पहिलवान डेअरीच्या मागे पान टपरीशेजारी मोकळया जागेत ०२ इसम हे थांबलेले असून ते नुकतेच सदर ठिकाणी आलेले असून त्यातील बजाज पल्सर काळया रंगाचे व हिरो होंडा दुचाकी गाडीस पुढे नंबर प्लेट नाही, तसेच दोन सायकल चालू स्थितीतील आहेत सदरची वाहने ही चोरीच्या असल्याबाबत आम्हास कळवले असता आम्ही लागलीच मिळालेली बातमी मा.वरिष्ठांना कळविले. मा.वरिष्ठांनी योग्य त्या सुचना देऊन खात्री करुन कायदेशिर कारवाई करण्याचे आदेश दिले.

प्राप्त बातमीप्रमाणे तपासपथक अधिकारी व स्टाफ असे बातमी ठिकाणी जावून पाहणी करुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) बजाज पल्सर काळया रंगाची व लाल रंगाची पट्टा असलेली मोटर सायकल किमंत रुपये ४०,०००/- रु. तसेच २) हिरो होंडा काळया रंगाची मोटर सायकल पुढे नंबर प्लेट नाही व मागे नंबर प्लेट एमएच-१२-डीडब्लू-१८३१ किमंत रुपये १५,०००/- रु. हिरो होंडा कंपनीची तसेच दोन सायकल त्या अनुक्रमे १) एक ५ के बाईक्स फॉक्सी हया कंपनीची व २) एक को-याडो कंपनीची सायकल चालू स्थितीतील ताब्यात घेण्यात आलेली आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या मोपेड मोटर सायकल व सायकल बाबत अधिक तपास करता सदर दोन्ही मोपेड मोटर सायकल बाबत खडकी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ४७५/२०२३ भादंवि.कलम ३७९ प्रमाणे, २) खडकी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ३१/२०२३ भादंवि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद असलेबाबत तसेच एक ५ के बाईक्स फॉक्सी हया कंपनीची सायकल बाबत ३) खडकी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर १०८/२०२३ भादंवि. कलम ३७९ प्रमाणे दि. ०४/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर अल्पवयीन बालकाकडुन एकुण ०३ गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहे. सदर विधीसंघर्षीत बालकांना त्यांचे पालकांचे ताब्यात देण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी  मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ४,पुणे शहर,श्री.विजयकुमार मगर, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे शहर श्रीमती आरती बनसोडे, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर,श्री. गिरीशकुमार दिघावकर, यांचे मार्गदर्शनाखाली, तपासपथकाचे पोउप निरीक्षक संतोष भांडवलकर, सपोफौ तानाजी कांबळे, पोलिस अमंलदार  निकाळजे,कलंदर,अतुल इंगळे,अनिकेत भोसले,ऋषिकेश दिघे,केदारी, यांनी केलेली आहे.